# जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, वाशिम

या कार्यालयामार्फत राबविल्या जाणा-या योजना लाभार्थ्यांची व अंमलबाजावणी बाबत माहीती.

1) **NRLM** - राष्ट्रीय ग्रामीण जिवन्नौनती अभियान महाराष्ट्र अंतर्गत वाशिम जिल्हयात महीलांची आर्थीक सामाजीक उन्नती होण्याच्या दृष्ट्रीने महीलांना विविध उपजिविका व तंत्रज्ञान विषयात पारांगत करुन त्यांच्या दैनंदिनी जिवनातील खर्च कमी करुन विविध उपजिविकेचे नविन साधन निर्माण करुन आवश्यक निधी उपलब्ध करुन देणे तसेच आवश्यक स्कील प्रशिक्षण देवुन रोजगारांच्या संधी उपलब्ध करुन देणे तसेच बाहय समुह संसाधन व्यक्तीची चमु वर्धनी एका गावात 15 दिवस निवासी राहुन स्वयंसहायता समुह संस्थापन करने महाराष्ट्र राज्य ग्रामीण जिवन्नौनती अभियान अंतर्गत विकलांग व्यक्तीचे अधिकार हक्क मिळवुन देणे व त्यांना स्वयंसहायता गटाचे माध्यमातुन त्यांची उपजिविका सक्षम करण्याचे उपक्रम राबविले जातात तसेच जेष्ठ नागरीकांचे समुह या अभियाना मार्फत तयार करण्यात आले आहे.

उमेद - उमेद अभियान हे पुर्णत: महील्यांच्या सक्षमीकरणावर भर देत असुन महीलांना विविध विषयात पारंगत करुन त्यांच्या माध्यमातुन इतर गावात अमल बजावणी करण्यात येत आहे. उमेद अभियान हे महीलासोबत काम करीत असले तरी अभियानाचा मुख्य उद्वेश हा कुटूंबाची आर्थीक उन्नती व्हावी हा आहे. करीता उपजिविकेच्या माध्यमातुन विविध उपक्रम राबविण्यात येत असुन त्याबाबत तांत्रीक प्रशिक्षणही देण्यात येत आहे. यामध्ये पशुसखी, कृषी सखी इत्यादी विषयी महीलांना नियमीत प्रशिक्षण व पाठपुरावा करुन गावातील गरीब कुटूंबांना उपजिवेकेचे विविध उपक्रमामध्ये सहभागी करुन घेण्यात येत आहे. तसेच विविध शासकीय योजना व बॅकमार्फत वित्त व कर्ज पुरवठा करण्याकरीता मार्गदर्शन सहाय्य करण्यात येत आहे.

सदर कार्यालयामार्फत राबविल्या जाणा-या योजना लाभार्थ्यांची व अंमलबाजावणी बाबत माहीती.

## 2) प्रधानमंत्री आवास योजना -

SECC- 2011 नुसार सदयस्थितीत Generator Priority list प्रपत्र ब मधिल लाभार्थ्यांना सन 2016-17 पासुन (कुटूंब प्रमुखांना)लाभ देण्यात येतो. कच्या/पक्या स्वरुपाचे घर असणा-या लाभार्थ्यांना लाभ देण्यात येतो. सन 2016-17 ते 2024-25 मध्ये एकुण उदिष्टे 63,200 प्राप्त होते. पैकी मंजुर 63,181 झाले असुन आर्थीक वर्षात 21042 घरकुले पुर्ण झाली आहे.

## 3) रमाई आवास योजना -

ग्रामीण भागातील दारीद्र रेषेखालील बेघर कुटूंबाना प्रतिक्षा यादीत समाविष्ठ असलेल्या अनुसुचीत जाती/नवबौध्द घटका अंतर्गत लाभार्थीना निवारा उपलब्ध  करुन देण्याबाबतची सामजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग महाराष्ट्र राज्य शासनाची योजना असुन सदर योजना इंदीरा आवास योजनेच्या धर्तीवर राबविण्यात येत आहे. सदर योजना वाशिम जिल्हयामध्ये सन 2016-17 पासुन निर्देशानुसार राबविण्यात आली आहे. सन 2016-17 पासुन आता पर्यंत 15374 घरकुले मंजुर करण्यात आली असुन 10987 घरकुले पुर्ण झाले आहेत.

## 4) शबरी आवास योजना -

ग्रामीण भागातील दारीद्र रेषेखालील बेघर कुटूंबाना प्रतिक्षा यादीत समाविष्ठ असलेल्या अनुसुचीत जमाती अंतर्गत लाभार्थीना निवारा उपलब्ध  करुन देण्याबाबतची सामजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग महाराष्ट्र राज्य शासनाची योजना असुन सदर योजना प्रधानमंत्री आवास योजनेच्या धर्तीवर राबविण्यात येत आहे. सदर योजना वाशिम  जिल्हयामध्ये सन 2016-17 पासुन निर्देशानुसार राबविण्यात आली आहे. सन 2016-17 पासुन आता पर्यंत 3020 घरकुले मंजुर करण्यात आली असुन 2158 घरकुले पुर्ण झाले आहेत.

## 5) मोदी आवास योजना -

ग्रामीण भागातील दारीद्र रेषेखालील बेघर कुटूंबाना प्रतिक्षा यादीत समाविष्ठ असलेल्या इतर मागासवर्गीय व विशेष मागासवर्गीय घटकातील लाभार्थींना निवारा उपलब्ध करुन देण्याबाबतची सामजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग महाराष्ट्र राज्य शासनाची योजना असुन सदर योजना प्रधानमंत्री आवास योजनेच्या धर्तीवर राबविण्यात येत आहे. सदर योजना वाशिम जिल्हयामध्ये सन 2023-2024 पासुन निर्देशानुसार राबविण्यात आली आहे. सन 2023-2024 पासुन आता पर्यंत 12455 घरकुले मंजुर करण्यात आली असुन 8561 घरकुले पुर्ण झाले आहेत.

## 6) संत सेवालाल महाराज बंजारा / लमान तांडा समृध्दी योजना -

संत सेवालाल महाराज बंजारा/लमान तांडा समृध्दी योजना राबविण्याकरीता महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग यांनी शासन निर्णय दि.23 फेब्रुवारी 2024 अन्वये मार्गदर्शक सुचनेनुसार प्रशासकीय मान्यता घेण्यात आलेली असुन सदर योजनेकरीता 5.60 कोटी निधी मंजुर झाला असुन चार पंचायत समिती अंतर्गत 33 ग्रामपंचायतीमधील 39 तांडयामध्ये 55 कामे मंजुर झालेली आहे सद्यस्थितीत कामे प्रगती पथावर आहेत.